आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १२० वा ● शुक्रवार दि. ०४ ऑक्टोबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## गंजगोलाई परिसरात मनपाची अतिक्रमण हटाव कारवाइ



लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर मनपाच्या वतीने गंजगोलाई परिसरात अतिक्रमण हटाव कारवाई करण्यात आली.गांधी चौक पोलिसांच्या सहकार्यातून झालेल्या या कारवाईत १६ हातगाडे जप्त करण्यात आले.गंजगोलाई परिसरात वाहतुकीला अडथळा होत असल्याने ही कारवाई करण्यात आली. गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे व त्यांचे सहकारी तसेच मनपाचे क्षेत्रीय अधिकारी पवन सुरवसे, अतिक्रमण विभागाचे प्रमुख रवी कांबळे, स्वच्छता निरीक्षक सिद्धाजी मोरे,अजय घोडके,मुस्तफा शेख व कर्मचाऱ्यांनी यात सहभाग घेतला. यापुढेही ही मोहीम सुरूच राहणार असल्याचा इशारा मनपाकडून देण्यात आला आहे.

## महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेअंतर्गत शेतकऱ्यांच्या खात्यात आले ४६ कोटी ७० लाख रुपये

लातूर(जिमाका)– महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेमध्ये ज्या शेतकऱ्यांनी मागील महिन्यात आधार प्रमाणीकरण केले आहे, अशा राज्यातील ११ हजार ८३६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ४६ कोटी ७० लाख रुपये रक्कम शासनामार्फत नुकतीच वर्ग करण्यात आली आहे. यामध्ये लातूर जिल्ह्यातील ५४९ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १ कोटी ५५ लाख रुपये रक्कम बँक खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

या प्रोत्साहनपर लाभ योजनेतंर्गत राज्यात ३३ हजार ३५६ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केले नसल्याचे शासनाच्या माहे ऑगस्ट २०२४ मध्ये निर्दशनास आले होते. त्यामुळे या शेतकऱ्यांना ५० हजारापर्यंतच्या प्रोत्साहनपर योजनेचा लाभ मिळाला नव्हता. या शेतकऱ्यांना १२ ऑगस्ट २०२४ ते ३० सप्टेंबर २०२४ या कालावधीत आधार प्रमाणीकरणाची संधी देण्यात आली होती. या कालावधीत आधार प्रमाणीकरण केलेल्या राज्यातील ११ हजार ८३६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ४६ कोटी ७० कोटी रुपये प्रोत्साहनपर लाभाची रक्कम १ ऑक्टोंबर २०२४ रोजी वर्ग करण्यात आली आहे. तसेच जे शेतकरी आधार प्रमाणीकरण करण्यापूर्वी मयत झाले आहेत, अशा शेतकऱ्यांच्या वारसांची नांवे योजनेच्या पोर्टलवर समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या प्रक्रियेनंतर आधार प्रमाणीकरण व योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

या योजनेमध्ये सन २०१७–१८, २०१८–१९ व २०१९–२० या तीन वर्षामध्ये कोणत्याही दोन वर्षात बँकेकडून पीक कर्जाची उचल करुन नियमित परतफेड केलेली आहे, अशा राज्यातील एकूण १४ कोटी ५० लाख शेतकऱ्यांना आजपर्यत एकू ५ हजार ३१० कोटी रुपये रक्कमेचा लाभ देण्यात आला आहे. यामध्ये लातूर जिल्ह्यातील १ लाख २८ हजार ८८ शेतकऱ्यांना ४१० कोटी ५२ लाख रुपयांचा लाभ मिळाला आहे.

## महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला काय? संजय राऊत म्हणाले, ''आमचं ठरलंय जो..''

मुंबई:महाराष्ट्रात महाविकास आघाडीतले पक्ष म्हणजे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना हे पक्ष आणि इतर छोटे पक्ष या सगळ्यांना बरोबर घेऊन आम्ही निवडणुकीला साम रे जाणार आहोत. जिंकेल त्याला उमेदवारी हे आमचं सूत्र आहे. समाजवादी पक्ष कुठे जिंकतोय तर त्यांना जागा दिली जाईल. जागावाटपाचं आमचं सूत्र हेच आहे. २०० जागा लढवणार, १०० जागा लढवणार असं काहीही आमच्यात चाललेलं नाही. शिवसेनेला किती जागा? वगैरे प्रश्न नाही. तिन्ही पक्ष आणि पक्षप्रमुख हे संख्येवर बोलतच नाही. आम्ही सगळे मिळून महाविकास आघाडी म्हणून लढत आहोत. असंही संजय राऊत यांनी म्हटलं आहे.



प्रत्येक विधानसभा मतदारसंघावर आमची चर्चा होते आहे. प्रत्येक मतदारसंघाचे पैलू वेगळे असतात. आमची चर्चा मतदारसंघांप्रमाणे होते आहे. आम्ही संख्येचा विचार करत नाही त्यावर गेलो असतो की तुम्ही १०० लढा, तुम्ही ८० लढा हे असं करायचं असतं तर हा तासाभराचा खेळ असतो. आम्हाला भाजपाचा आणि गद्दार गटाचा पराभव करायचा आहे. भ्रष्टाचार आणि आर्थिक गटाचा पराभव करायचा आहे. दसऱ्याच्या आत सगळं चित्र स्पष्ट होईल.

आमच्याकडे काही कुणी दिल्लीतून येणार नाही. जसं आता देशातले गृहमंत्रीच येऊन बसलेत, पंतप्रधान येणार आहेत. मेट्रोच्या उद्घाटन निमित्ताने येणार आहेत, पण ठाण्यात जाणार आहेत. पाचपाखाडीला जाणार, वाघबीळला जातील, भांडुप गाव, कांजूर गावातही जातील, पंतप्रधान अशासाठी येतात का? असा खोचक प्रश्नही संजय राऊत यांनी विचारला. त्याचप्रमाणे सरदार वल्लभभाई पटेल हे जागावाटपासाठी येऊन बसायचे का? असाही प्रश्न त्यांनी विचारला. सरदार पटेलांनी देशाचा विचार केला, राष्ट्रीय सुरक्षेचा विचार केला. त्यांनी त्यांच्या पक्षाच्या वॉर्डा वॉर्डात जाऊन प्रचार करत नव्हते. एकच सभा घ्यायचे ते पुरेसे असायचे. आमचे पंतप्रधान आणि गृहमंत्री प्रचारासाठी गल्लीबोळांत फिरत आहेत अशी टीका संजय राऊत यांनी केली.

२६ नोव्हेंबरच्या आधी निवडणूक घ्यावीच लागेल. निवडणूक लांबणीवर वगैरे काहीही जाणार नाही. व्होट जिहादच्या गोष्टी देवेंद्र फडणवीस करत आहेत. पण व्होट जिहाद काय असतो मला सांगा. या देशात देशाचे नागरिक मग तो मुस्लिम असो, जैन, पारशी असो किंवा हिंदू असो तो मतदान करतो. तो मतदार तुम्हाला मतदान करतो ते चालतं का? जर व्होट जिहाद आहे तर मग मुस्लिम महिलांसाठी ट्रिपल तलाकचा कायदा का आणला? इतर सम ाजाचे लोक तुम्हाला मते देतात. महाराष्ट्रात गुजराती लोक भाजपाला मतदान करतात मग त्याला काय म्हणायचे? गुजराती लोकांचे व्होट जिहाद म्हणणार का? असा प्रश्न संजय राऊत यांनी विचारला.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्याला आधार सीडिंगची कार्यवाही दोन दिवसात पूर्ण करावी- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज केलेल्या काही पात्र महिलांच्या बँक खात्याला आधार क्रमांक संलग्न नसल्याने त्यांच्या बँक खात्यात योजनेची रक्कम जमा झालेली नाही. अशा महिलांच्या बँक खात्यांना आधार क्रमांक संलग्न (आधार सीडिंग) करण्याची कार्यवाही दोन दिवसात पूर्ण करावी. यासाठी संबंधित शासकीय अधिकारी, कर्मचारी आणि बँक अधिकारी यांनी समन्वयाने काम करावे. या कामाला प्राधान्य द्यावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी आज येथे दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या.




जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रमेश जाधव, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रवीण खडके, गोपाळ पवार, आत्माचे प्रकल्प संचालक शिवसांब लाडके, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक प्रमोद शिंदे, मत्स्य व्यवसाय सहायक आयुक्त तेजस्विनी करळे यांच्यासह विविध बँकांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

बँक खात्याला आधार क्रमांक संलग्न नसलेल्या महिलांची यादी संबंधित अंगणवाडी सेविकेकडे पाठविण्यात आली आहे. तसेच संबंधित महिलांना बँकेत जावून आधार क्रमांक बँक खात्याला संलग्न करण्याबाबत माहिती देण्यात आली आहे. या महिला बँकेत आल्यानंतर बँकेतील अधिकारी, कर्मचारी यांनी आधार संलग्न करण्याची कार्यवाही प्राधान्याने करावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे म्हणाल्या. तसेच शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांचे कर्ज प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यावर बँकांनी तातडीने कार्यवाही करावी. तसेच संबंधित शासकीय विभाग आणि बँकांनी समन्वयाने काम करून हे प्रस्ताव लवकरात लवकर निकाली निघण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्याला आधार संलग्न करण्याची कार्यवाही वेगाने पूर्ण होणे आवश्यक आहे. यासाठी पुढील दोन दिवस बँकांनी विशेष मोहीम राबवून काम करावे, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सांगितले.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख यांनी आधार संलग्न नसलेल्या लाभार्थ्यांची तालुकानिहाय आकडेवारी सांगितली. जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, मत्स्यव्यवसाय विभाग, पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचा यावेळी आढावा घेण्यात आला.

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मराठी भाषा विभागाचे मंत्री यांनी मानले केंद्र सरकारचे आभार

नवी दिल्ली: प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यास मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळाचे आभार मानले आहेत.



मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याची ऐतिहासिक घटना घडली आहे. हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाणारा दिवस आहे. राज्य शासनाने यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. हा क्षण प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाचा क्षण असून आपल्या भाषेची समृद्धी आणि वारसा जपण्यास हे महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मराठी भाषा मंत्री यांनी व्यक्त केली आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी अनेक मराठी भाषक, विचारवंत, भाषेचे अभ्यासक, साहित्यिक आणि समीक्षकांचे साह्य झाले. त्यांच्यासह मोलाचे सहकार्य करणाऱ्या तसेच मराठी भाषिक व मराठीवर प्रेम करणाऱ्या सर्वांचे अभिनंदन करून त्यांनी सर्वांना धन्यवाद दिले आहेत.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी राज्य शासनाने केलेल्या पाठपुराव्यासंदर्भात मराठी भाषा विभागाने दिलेली माहिती

अभिजात भाषेचा दर्जा देण्याची कार्यवाही केंद्र शासनाकडून केली जाते. यासाठी केंद्र शासनाने निकष विहित केले आहेत.

१५००–२००० वर्षापर्यंतची अगदी सुरूवातीच्या ग्रंथाची / अभिलिखित इतिहासाची अति प्राचिनता:

भाषकांच्या पिढ्यांनी एक मौल्यवान वारसा म्हणून मानलेले प्राचीन साहित्य / ग्रंथाचा भाग:

साहित्यिक परंपरा मूळ असावी आणि ती अन्य भाषक समाजाकडून उसनवारी केलेली नसावी:

अभिजात भाषा व साहित्य हे अर्वाचीन साहित्यापेक्षा भिन्न असल्यामुळ अभिजात भाषा आणि नंतरची रूपे किंवा तिच्या उप भाषा यामध्ये खंड देखील असू शकेल.

या निकषांच्या आधारे संशोधन आणि अभ्यास करुन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासंदर्भात राज्य शासनाने ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा तज्ज्ञ संशोधकांची समिती दि.१०.०१.२०१२ च्या शासन निर्णयानुसार गठीत केली होती.

या समितीने बरेचसे इतिहास संशोधन केले असून जुने संदर्भ, प्राचीन ग्रंथ, पुरातन काळातील ताम्रपट, कोरीव लेख, शिलालेखांचा संदर्भ इ. प्राचीन दस्ताऐवज तपासले असून त्यांचा आधार घेऊन पुराव्यासह एक सर्वंकष व परिपूर्ण अहवाल शासनास सादर केला आहे. या अहवालामध्ये सविस्तर विवेचनासह मराठी भाषा ही अभिजात भाषेचा दर्जा मिळणेसाठी विहीत केलेल्या निकषांची पूर्तता करते हे पुराव्यांसह स्पष्ट केले.

समितीने तयार केलेला मराठी भाषेमधील मूळ अहवाल दि.१२.०७.२०१३ च्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे पाठविला आहे. त्यानंतर समितीने परिशिष्टांसह सादर केलेला इंग्रजीमधील अहवाल देखील केंद्र शासनाकडे दि.१६.११.२०१३ रोजी पाठविला.

तद्नंतर सदर प्रस्तावाबाबत सचिव, प्रधान सचिव, मुख्य सचिव, मंत्री, मुख्यमंत्री यांचे स्तरावर सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला.

दि. २७.०२.२०२० रोजी 'मराठी भाषा गौरव दिनाचे' औचित्य साधून, सन २०२० च्या द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी शिफारस करणारा शासकीय ठराव महाराष्ट्र विधिमंडळांच्या दोन्ही सभागृहांमध्ये पारित करुन पुढील कार्यवाहीसाठी केंद्र शासनास अग्रेषित करण्यात आला.

या संदर्भात राज्यशासनाचा प्रस्ताव अन्य मंत्रालये व साहित्य अकादमीच्या भाषा तज्ज्ञ समिती मार्फत विचाराधीन असल्याचे केंद्रशासनाने त्यांच्या दि. २०/१०/२०२० च्या पत्रान्वये कळविले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा लवकर मिळावा यासाठी पत्र माहिम राबवून राष्ट्रपती महोदयांना साधारणपणे १ लक्ष पत्रेही पाठविण्यात आली.

प्रस्तावाबाबत सर्वच स्तरावरुन केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि. २४.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. पंतप्रधान महोदयांना मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत विनंती केली आहे. त्यास अनुसरून केंद्रशासनाच्या संस्कृती मंत्रालयाने दि. ०३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा राज्यशासनाचा प्रस्ताव केंद्रिय मंत्रालयाच्या विचाराधीन असून त्याबाबतची कार्यवाही सुरू असल्याचे कळविले.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याकरिता ज्ञानेश्र्वर मुळे सेवानिवृत्त (भा. वि.से.) यांच्या अध्यक्षतेखाली विभागाच्या अधिनस्त कार्यालयांच्या अध्यक्षांचा सदस्य स्वरुपात समोवश असलेली एक समिती शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दि.१४.०२.२०२४ अन्वये गठित करण्यात आली.

त्यानुसार सदर समितीच्या आतापर्यंत दोन बैठका झाल्या असून या समितीद्वारे केंद्रशासनाकडे पाठपुरावा चालू होता.

## १०० रुपयांचा स्टँप बंद, सर्वसामान्यांना भुर्दंड

मुंबई: सरकारी दस्तावेज असो किंवा साधी नोटरी करायची असो, तसेच बँकेतून कर्ज घ्यायचे असो सर्वसाधारणपणे नागरिकांना किंमान १०० रुपयांच्या स्टँप पेपवरुन दस्तावेज तयार करता येत होतो. १००, २०० आणि ५०० रुपयांच्या स्टँपवर नागरिकाचा दस्तावेज ग्राह्य धरला जात होता. मात्र, यापुढे १०० आणि २०० रुपयांचे स्टँप पेप इतिहासजमा होणार आहेत. कारण, आता किमान ५०० रुपयांच्या स्टँपवरच खरेदी, नोटरी, हक्क किंवा प्रतित्रापत्र दिले जाणार आहे. राज्य सरकारने मुद्रांक शुल्क वाढीचा निर्णय घेतल्यामुळे महसूल विभागाकडून आता केवळ ५०० रुपयांचे स्टँप जारी केला जातील. त्यामुळे, सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड बसणार आहे. राज्य शासनाने सरकारचा महसूल वाढविण्यासाठी हा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

तहसील किंवा महसूल कार्यलयात अवघ्या शंभर, दोनशे रुपयांत स्टँप केले जात. वैयक्तिक कारणांसह बँक व विविध कामांसाठी केल्या जाणाऱ्या प्रतिज्ञापत्रासह साठेखतानंतरचे खरेदीखत, हक्क सोडपत्रासाठी आता पाचशे रुपयांचे मुद्रांक शुल्क मोजावे लागणार आहे. राज्य सरकारने 'लाडकी बहीण' योजनेसह विविध प्रकारच्या योजनांवर कोट्यवधी रुपयांची खैरात केल्याने अन्य योजनांसाठी निधी कमी पडू लागल्याचे चित्र आहे. त्यामुळे महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी मुद्रांक शुल्कात वाढ केल्याची चर्चा महसूल खात्यांतर्गत बोलली जात आहे. ऐन विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर सरकारने लाडकी बहीण योजनेसह विविध योजनांसाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद केली आहे. त्यामुळे, आता महसूल वाढविण्यासाठी नवनवीन प्रयोग केला जात आहेत.प्रतिज्ञापत्र, हक्कसोडपत्र, साठेखत केल्यानंतर पुन्हा खरेदीखत करताना ते शंभर रुपयांच्या मुद्रांक शुल्कावर केले जात होते. त्यासाठी आता शंभरऐवजी पाचशे रुपयांचे मुद्रांक शुल्क वापरण्यात येणार आहे. सरकारी कार्यालयातील कामांसाठी मुद्रांक शुल्क माफीचा निर्णय यापूर्वीच झाला आहे. त्यामध्ये, कोणताही बदल झाला नसल्याचीही माहिती आहे.

स्थावर, जंगम मालमत्तेसाठीचा दस्तावेज कंपन्यांच्या एकत्रीकरण, पुनर्रचना, विलिनीकरण तसेच विभागणीमध्ये विद्यमान किंवा भविष्यातील मतभेद मिटविताना लवादामार्फत लेखी निर्णय दिला जातो. कंपन्यांचे भागभांडवल मोठे असल्याने त्यांच्या स्थावर, जंगम मालमत्तेप्रकरणी अभिहस्तांतरणामध्ये सध्या पाचशे रुपये मुद्रांक शुल्क आकारणी होते. वाढीसाठी पाचशे रुपयांवरून चल व अचल मालमत्तेच्या बाजारमूल्यप्रमाणे दर बदलले जातात. मात्र, सर्वसामान्य नागरिकांना १०० आणि २०० रुपयांच्या स्टँप पेपरवर त्यांचे दस्तावेज तयार करता येत होते. आता, त्यासाठी किमान ५०० रुपयांच्या स्टँपवर दस्तावेजवर बनवावे लागणार आहेत.

## दसरा महोत्सव, बाभळगाव निमीत्त आयोजित करण्यात आलेल्या रामलीला कार्यक्रमास पोलीस अधीक्षक सोमय मुंडे राहणार उपस्थित

लातूर प्रतिनिधी: बाभळगाव येथे दसरा महोत्सवानिमित्त आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वामी श्री भुवनेश्र्वर वशीष्ठजी महाराज यांची रामलीला कथा आयोजीत करण्यात आली आहे. या रामलीला कार्यक्रमास लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर रोजी उपस्थितीत राहणार आहेत.दसरा महोत्सवा निमीत्त बाभळगाव येथे नवरात्र महोत्सव समिती, ग्रामपंचायत, सेवा सोसायटी, तंटामुक्त ग्राम समिती व ग्रामस्थ बाभळगाव यांच्या वतीने रामलीला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्वामी श्री भुवनेश्र्वर वशीष्ठजी महाराज यांची रामलीला कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, मैदान, बाभळगाव येथे आयोजीत करण्यात आली आहे.

या रामलीला कार्यक्रमास लातूरचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे शुक्रवार दि. ४ ऑक्टोबर रोजी उपस्थितीत राहणार आहेत. या रामलीला कार्यक्रमात दुसऱ्या दिवशी मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम जन्म, रावण तपस्या संपन्न होऊन ही रामलीला शनिवार दि. १२ ऑक्टोंबर रोजी मेघनाथ वध, रावण वध, भरत भेट, मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम राज्याभिषेक सादर करुन संपणार आहे. या रामलीला कार्यक्रमाचा सर्व भावीकभक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष नवरात्र महोत्सव समिती बाभळगाव, अध्यक्ष, नवरात्र महोत्सव समिती, बाभळगाव जीवनराव गुंडेराव देशमुख, ग्रामपंचायत सरपंच प्रिया सचिन मस्के, उपसरंपचं गोविंद देशमुख, विविध कार्यकारी सेवा सोसायटी चेअरमन महादेव गंगाराम जटाळ, व्हा. चेअरमन शिवाजी आप्पाराव जाधव, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष शिवराज नागोराव देशमुख व ग्रामस्थ बाभळगाव वतीने करण्यात आले आहे.




## दिवाळी अंक निमित्त जाहिरातीसाठी संपर्क करा !

दैनिक लातूर प्रभात या वृत्तपत्र वाचकास नम्र विनंती की, दरवर्षा प्रमाणे याही वर्षी दिवाळी विशेष अंक प्रकाशीत करण्यात येणार आहे, कृपया आपल्याकडून जाहिरातीची अपेक्षा आहे.
Email.laturprabhat@gmail.com

# झरोका

एक – जम्मू-काश्मिर सारख्या राज्यात बहुसंख्येने मतदान झाले विजय कोणाचा, कोणत्या पक्षाचा होईल हे महत्त्वाचे नाही परंतु ते एकवटलेले दिसत आहेत. हा आदर्श महाराष्ट्रातील जनता घेईल की नाही याबाबत शंकाच वाटते कांहीच कळत नाही. डोकं बधिर झालंय.

दुसरा – अरे अचानक जम्मू-काश्मीर कसा काय घेऊन आलास काय झाले तुला जम्मू-काश्मीर आणि महाराष्ट्राची तुलना कशी काय करू शकतोस.

एक – अहो, जम्मू-काश्मीर मध्ये पहिल्यांदाच लोकशाही मार्गाने जास्तीचे मतदान झाले आहे मोदी सरकारने ३७० कलम रद्द करून जम्मू-काश्मीरचे तुकडे करून लेह- गडाख असे दोन तुकडे केले. तरीही कसलाही दगाफटका न होता मतदान झाले म्हणून महाराष्ट्रातील जनतेनेही भाजपा, दगाबाज पवार-शिंदे यांना न भीक घालता मतदान केले तर बरे होईल म्हणूनच बोलतो आहे.

दुसरा – अरे, महाराष्ट्र हा खऱ्या अर्थाने भारताचा मालक-पालक आहे. एक स्त्रोत आहे महाराष्ट्र बिघडला तर देश पलटला समज. पण नको ते भय मनात आणू नकोस.

एक- अहो, मला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा याची भूमिका संशयी वाटते. लोकसभा निवडणूक पासून ते महाराष्ट्रात गिधाडासारखे गीरट्या घालीत आहेत. आता तर विधानसभा निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच दौऱ्याचा सपाटा लावलास यातले गौडबंगाल काय हेच कळत नाही, म्हणून बोलतोय.

दुसरा – अरे, महाराष्ट्राची जनता संयमी-सहनशील आहे. सहनशीलता संपली तर आलं अंगावर घेतलं शिंगावर अशीच कृती-वृती महाराष्ट्रीयन मतदारांची आहे समजलं.

एक – अहो, महाराष्ट्रातील निवडणुका या जम्मू-काश्मीरच्या निकालावर अवलंबून आहेत तिथं भाजपा पराभव झाला की महाराष्ट्राची निवडणूक लांबणीवरच निवडणूक आयोगाच्या आयुक्ताचा अहवाल असल्याचे बोलले जात आहे म्हणून शंका येते आहे.

दुसरा – अरे, अहवाल कोणाचाही कसला ही असला तरी निवडणुका होणार हे अटळच आहे. महाराष्ट्राचा आदर्श आजवरच्या महाराष्ट्रीय इतिहासाचा घ्यावा. एवढेच जम्मू-काश्मीर काय घेऊन बसलास.

# काय बोलता राव ?

विधानसभा निवडणूक दरम्यान सर्व पक्षीय नेत्यांची लगबध उदगीर-जळकोट राखीव मतदार संघासाठी होताना दिसते आहे. महायुतीचे विद्यमान मंत्री संजय बनसोडे हे संभाव्य उमेदवार निश्र्चित असले तरी महायुतीतूनच अनेकांची नावे चर्चेत आहेत, महाविकास आघाडी तर्फे माजी आमदार सुधाकर भालेराव यांचे नाव ठरलेले दिसत असले तरी अनेकांची नावे चर्चेत असतानाच माजी मंत्री देशमुख यांनी मात्र उदगीरची जागा काँग्रेसलाच मिळणार असून अधिकृत उमेदवार उदगीरच्या माजी नगराध्यक्ष उषा कांबळे याच असतील असा निर्वाळा दिला आहे.

**काय बोलता राव,**

अरे माझी मंत्री आ. अमित भैया देशमुख यांचेच लातूर मतदारसंघात तळ्यात की मळ्यात झाले आहे. लातूर मतदार संघातून डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांचे नाव निश्र्चित झाले असून अरविंद पाटील निलंगेकर यांचेही नाव चर्चेत असून महाविकास आघाडीने अद्याप उमेदवार जाहीर केला नाही आणि मग आ. अमित देशमुख यांना उदगीरचा उमेदवार जाहीर करण्याचा अधिकार कोणी दिला तुम्हीच बोला दाजीबा!

# निवडणुकीच्या दसऱ्याआधी शिमगा !

## संपादकीय...

जात-धर्म, पंथ,विचार,आच-विचार, प्रणाली- प्रथा बाजूला ठेवून केवळ लोकशाही- संविधानाच्या नावाखाली जो काही गदारोळ चालू आहे तो चिंताजनक वाटतो आहे ज्यांच्याकडे गदा पेलण्याची क्षमता नाही ते लोकप्रतिनिधी झाले आणि केवळ सत्तेसाठी इकडून तिकडे- तिकडून इकडे करणारे महाभाग आजघडीला सामाजिक न्याय, सर्वांगीण विकासाच्या बाता मारून आपापल्या पक्षाच्या सत्ताकारणासाठीच जनतेची फसगत करून येत्या विधानसभा निवडणुकीत स्वपक्षाची सत्ता कशी येईल यातच गर्क असल्याचे दिसते ही बाब लोकशाही राजकारणाला साजेशी आहेच पण उमेदवार निवडीतच लोकशाही नसेल तर काय असा सवाल सर्वसामान्य जनतेतून उमटताना दिसतो आहे हे वास्तव नाकारता येत नाही.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका जाहीर होण्याआधीच आणि आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच महायुती- महाविकास आघाडीतील इच्छुक उमेदवारांमध्ये धरसोड अवस्था पसरल्याचे दिसते आहे, महायुतीकडून उमेदवारी मिळाली नाही तर महाविकास आघाडीचे दर्शन घ्यावे, महाविकास आघाडीने नाकारले तर महायुतीचे पाय धरावे अशी अवस्था उधाळा आमदार होऊ पाहणाऱ्या सर्वपक्षीय नेते कार्यकर्ते यामध्ये रस्सीखेच होताना दिसते आहे. परंतु महायुती किंवा महाविकास आघाडीचे नेते निर्णय गुलदस्त्यात ठेवून चढाओढ करीत असले तरी गोसाव्याची गत होऊ नये म्हणून सर्वपक्षीय नेते तडजोडीवर ठाम असल्याचे राजकीय अंदाज सत्यात उतरतात की काय अशी चिन्हे दिसत आहेत.

राष्ट्रीय निवडणूक आयोगाचे आयुक्तांनी महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला. सर्वपक्षीय मोजक्या नेत्यांशी चर्चा केली आणि दसऱ्यानंतरच काय ते ठरवू, निवडणुका जाहीर करू किंवा त्या लांबणीवर टाकू यावरच आचारसंहितेचा विषय महत्त्वाचा ठरतो त्यामुळे राज्यस्तरीय सत्ताधारी- विरोधी लोकप्रतिनिधी सह प्रशासनही कामास लागले असले तरी निवडणुका आधीच दसऱ्यात शिमगा करण्याची खेळी सर्वपक्षीय नेत्यासह इच्छुक उमेदवारात होत असल्याची कुजबूज राजकीय वर्तुळात होताना दिसते आहे हे वास्तव नाकारता येत नाही.

विधान सभा निवडणुकीसाठी राज्यातील सर्वपक्षीय गट- तटातून एक- एका मतदारसंघासाठी नऊ-दहा इच्छुक उमेदवार निवडणूक लढविण्यासाठी पक्षाकडे उमेदवारीसाठी हट्टागृह करीत आहेत तो त्यांना हक्क असतो. कार्य, त्याग, प्रामाणिकता यावर कोणत्याही निवडणुकीतील उमेदवारी मिळत नसते हेच वास्तव ठरत असते. कारण आज घडीला महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या शिंदे- फडणवीस- पवार या गटात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार गटालाच झुकते माप दिले जात असून उद्याचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच असतील असाच पक्ष श्रेष्ठीचा डाव असावा अशी ओरड भाजपा नेत्यातून होताना दिसते आहे हे वास्तव असले तरी निवडणुकीच्या दसऱ्याआधी शिमगा कशाला अशीच राजकीय वर्तुळात कुजबूज होताना दिसते आहे.

दुसरीकडे सत्ताधारी महायुतीला कोणत्याही परिस्थितीत सत्तेवर येऊ देता कामा नये यासाठी महाविकास आघाडी- इंडिया नेत्यात एक मत असून महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीत जागा वाटपावरून मतभेद होत असले तरी मन भिन्नता होणार नाही याची काळजी घेऊन विधानसभा निवडणुकीचे सूत्र आखले जात असताना सत्ताधारी पक्षात-गटात मात्र जागा वाटप, मतदार संघातील वाद ,उमेदवारीहून हमरी-तुमरी असा हल्ला-हास्य कल्लोळ होत असून हा सत्ता खेळ वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्यावरून जनतेसमोर प्रकट होताना दिसत असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे एका मागून एक महाराष्ट्र दौरा करीत असले तरी महाराष्ट्रातला भाजपा फडणवीस गट, शिवसेना गट, राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्यातील मतभेद मिटू शकत नसल्याने फडणवीस गट वरिष्ठ ज्येष्ठ नेत्यावर नाराज दिसत असून निवडणूक जाहीर नाही, आचारसंहिता लागू नाही, पण निकाला आधीच-निवडणुकीच्या दसऱ्याआधीच शिमगा करण्याची वेळ कशासाठी यावी अशीच लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

# डान्सिंग स्टार मिथुनदांचा गौरव .....

हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना या वर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार हा कला क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार आहे. मिथुन चक्रवर्ती यांना जाहीर झालेला हा पुरस्कार म्हणजे त्यांनी आजवर केलेल्या अभिनय कलेचा गौरव आहे. मिथुन चक्रवर्ती यांनी जवळपास पाच दशके चित्रपट सृष्टीत व्यतीत केले असून हिंदी, बंगाली सह अनेक भाषेत अभिनय केला आहे. हिंदी चित्रपट सृष्टीत डान्सिंग स्टार म्हणून प्रसिद्ध असलेल्या मिथुन चक्रवर्ती यांचा जन्म १६ जून १९५० रोजी झाला. बी एस सी चे शिक्षण पूर्ण झाल्यावर अभिनय क्षेत्रातच करियर करायचे असे ठरवून त्यांनी पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्युटमध्ये प्रवेश घेतला. अभिनयाचे शिक्षण घेतल्यावर त्यांनी मृगया या बंगाली चित्रपटात अभिनय केला. मृगया या त्यांच्या पहिल्याच चित्रपटातील अभिनयासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला. पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने त्यांचे देशभर नाव झाले. त्यांनीही मग हिंदी चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी मुंबई गाठली मात्र इथे त्यांना सहजासहजी चित्रपट मिळाले नाही. त्यांनाही चित्रपटात भूमिका मिळवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. १९८२ साली आलेल्या डिस्को डान्सर हा त्यांचा तसा गाजलेला पहिला हिंदी चित्रपट. या चित्रपटाने त्यांना डान्सिंग स्टार बनवले पुढे हीच ओळख त्यांची कायम राहिली. त्यांनीही ही ओळख जपण्याचा प्रयत्न करत अनेक चित्रपटात अप्रतिम नृत्यकला सादर केली. या दरम्यान त्यांचे अनेक



चित्रपट हिट होत गेले. विशेषतः ८० च्या दशकात त्यांना अभूतपूर्व यश मिळाले. हम पांच, शौकीन, सुरक्षा, तराणा, वारदात, डिस्को डान्सर, प्यार झुकता नही, डान्स डान्स असे त्यांचे अनेक चित्रपट हिट झाले. तो काळ सुपरस्टार अमिताभ बच्चन यांचा होता. अमिताभ बच्चन यांनी नाकारलेले अनेक चित्रपट त्यांना मिळाले आणि त्यांनी त्यांचे सोने केले. त्यांच्याकडे चित्रपट दिग्दर्शक, निर्मात्यांची रांग लागू लागली म्हणूनच त्यांना गरीब दिग्दर्शकांचा अमिताभ असे म्हंटले जाऊ लागले. १९९० साली त्यांना अमिताभ बच्चन यांच्यासोबतच अग्निपथ चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे ही त्यांनी सोने केले. अमिताभ बच्चन यांच्यासमोर त्यांनी सशक्त अभिनय करून वाहवा मिळवली. ९० च्या दशकाच्या सुरुवातीला त्यांनी अनेक चांगल्या भूमिका केल्या मात्र ९० च्या उत्तरार्धात त्यांनी मिळेल त्या भूमिका स्वीकारल्या त्यामुळे त्यांचे अनेक चित्रपट फ्लॉप झाले. समीक्षकांनी त्यांना धारेवर धरले पण त्यांनी त्याची पर्वा केली नाही. उतार वयात मात्र ते चरित्र भूमिकांकडे वळले. वीर, गोलमाल ३, हाऊसफुल्ल २, ओह माय गॉड, खिलाडी ७८६, कांची, किक अशा चित्रपटातून त्यांनी चरित्र भूमिका साकारल्या. या भूमिकाही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या. छोट्या पडद्यावरील डान्स इंडिया डान्स या नृत्यावर आधारित कार्यक्रमात त्यांनी परीक्षक म्हणून काम केले. त्यांना तीन राष्ट्रीय, दोन फिल्मफेअर, दोन स्टार डस्ट व एक स्क्रीन अवॉर्ड मिळाला. आता त्यांना दादासाहेब फाळके हा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या अभिनय कारकीर्दीचा योग्य गौरव झाला असे म्हणावे लागेल. अर्थात त्यांना मिळालेल्या या पुरस्कारावरही काहींनी आक्षेप घेतला आहे. मिथुन चक्रवर्ती हे सत्ताधारी पक्षाचे समर्थक असल्याने त्यांना हा पुरस्कार दिला गेला असा आक्षेप घेतला जात आहे. अर्थात आक्षेप घेणारेही त्यांच्या अभिनय कलेचे प्रशंसक आहेत हे देखील तितकेच खरे आहे. दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचे मनापासून अभिनंदन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## डॉक्टर महिलेला धमकावत ६७ लाखांचा गंडा, दोघांना अटक

सोलापूर :खोट्या माहितीच्या आधारे धमकावत एका डॉक्टर महिलेकडून ६७ लाख २४ हजार रुपये उकळणाऱ्या मुंबईच्या दोघा सायबर गुन्हेगारांना सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयातील सायबर सेलच्या पथकाने सापळा रचून अटक केली. सोलापुरात राहणाऱ्या पीडित महिला डॉक्टर काही दिवसांपूर्वी कोल्हापुरातील आपल्या भावाच्या घरी वास्तव्यास असताना मोबाईलवरून, मी मुंबई गुन्हे शाखेतून बोलतो, तुम्ही सिमकार्डद्वारे अील चित्रफिती आणि माहिती पाठविल्याप्रकरणी मुंबईत टिळक नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे, हे प्रकरण विश्वास नांगरे-पाटील हाताळत आहेत. तुझे कॅनरा बँकेत खाते आहे. आधारकार्ड कोठे वापरले ? आधारकार्ड लोकांना का दिले ? त्याचे नियम तुम्हाला माहित नाहीत काय, असे म्हणून कॅनरा बँकेतील खात्याचा तपशील विचारून घेतला. नंतर पीडित डॉक्टर महिलेशी वारंवार संपर्क साधून अटकेची भीती दाखविली. या माध्यमातून पुन्हा पुन्हा धमकावत त्यांच्या वेगवेगळ्या चार बँक खात्यातून ऑनलाइन पद्धतीने ६७ लाख २४ हजार रुपये उकळण्यात आले.

# निर्भीड निर्भय निपक्षपाती स्तंभ

सागर तायडे यांच्या संदर्भात खर तर लिहीत असताना खूप बरे वाटते. त्याचे कारण की त्यांच्या लेखणी मधे सामन्य माणसाच्या वेदना कशा आहेत. त्यांना न्याय देण्यासाठी कोणत्या प्रकारची गरज आहे. आजपर्यंत ती गरीब माणसे न्याया पासून वंचित का राहिली. त्याला न्याय मिळवून देण्यासाठी कोणते प्रयत्न व्हायला हवेत, ती ना होण्याची कारणे काय? भारतीय संविधानामध्ये ईतर मागासवर्गीय,मागासवर्गीय,अनुसूचित जमाती यांच्या प्रगतीच्या दृष्टीने तरतूद करण्यात आली असताना ती प्रगती च्या दिशेने जाण्यासाठी विलंब का होत गेला. त्याची कारणे काय? अश्या सर्व बाबतीत त्यांचे लिखाण बघितले तर खरच निर्भीडपणे लिहणारा लेखक,सामान्य माणसाच्या हितासाठी,कल्याणासाठी लिहणारा स्तंभलेखक म्हणुन मला सागर तायडे महाराष्ट्रात दिसतात. त्यांचे लिखाण हे मग असंघटित कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी असेल, की कौटुंबिक कलह निर्माण होऊ नये यासाठी असेल, या सडेतोड पणे चुकलेल्या राजकीय घडामोडी वर असेल, सामाजिक प्रबोधन करणारे असेल,या धार्मिक संदर्भात असेल, जे जनहिताच्या दृष्टीने योग्य आहे असे त्यांनी लिखाण केले आहे.

महाराष्ट्रात जवळपास साठ दैनिका मध्ये सातत्याने त्यांचे लेख असतात. मग त्यात दैनिक मुक्त नायक कोल्हापूर असेल, या जनतेचा महानायक दैनिक मुंबई मध्ये असेल, दैनिक विश्र्वपथ मुंबई मध्ये असेल, कोकण सकाळ मध्ये असेल, या मग दैनिक, विदर्भ मतदार अमरावती, भंडारा पत्रिका दैनिक भंडारा मध्ये असेल, या दैनिक चन्द्र धून चंद्रपूर मध्ये असेल, या दैनिक जणसत्य, या दैनिक विश्र्व विजेता असेल, या दैनिक कटू सत्य असेल, दैनिक देशोन्नती असेल, नागपूरचा दैनिक बहुजन सौरभ असेल,बीड चा आमचा अभिमान असेल,लातूरचा महापर्व,दैनिक अजिंठा टाईम्स ,लातूर प्रभात,युवा छत्रपती,युतीचक्र,नांदेडचे युगांतर,श्रमिक एकजूठ,रिपब्लिकन गार्ड,परभणीचा शिल्पकार अशा अनेक जिल्ह्यातील दैनिका मध्ये त्यांचे आलेले लेख हे सामान्य माणसाला न्याय मिळण्या च्या दृष्टीने प्रबोधनात्मक असतात. त्यांचा लिखाणा संदर्भात त्यांना बर्याच लोकांनी, निर्भीडपणे लिहणारा स्तंभलेखक म्हणुन अभिप्राय ही दिलेला आहे.

मी मागील पाच वर्षापासून त्यांचे लिखाण वाचतो आहे. त्यांच्या अनेक लेखासंबंधी माझा अभिप्राय ही असतो. असे निर्भीड लेखक फार कमी असतात. अशा चांगल्या लेखकाच्या पाठीशी राहणे म्हणजे समता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेणार्या महापुरुषांच्या विचारांच्या आदर्शाचा सन्मान करणे होय.सागर तायडे यांचा लेख महाराष्ट्रात रोज कोणत्या ना कोणत्या तरी दैनिकात राहतो हे मात्र निश्र्चित आहे. ते सत्यशोधक कामगार संघटना मुंबई चे संस्थापक सदस्य आहेत. आज ते अध्यक्ष आहेत. ते स्वतंत्र मजदूर युनियन चे महाराष्ट्राचे अध्यक्ष आहे. ते निर्व्यसनी असून, निर्भीड वक्ता आहे. ते असंघटित क्षेत्रातील कामगारांना,नाका कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारे नेते असल्याने त्यांना गरिबाची जाणीव आहे. त्यांचे प्रेरणास्थान हे बुद्ध, महात्मा फुले,रावबाहदूर नारायण मेघाजी लोखंडे, छत्रपती शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर असल्याने त्यांच्या लेखणीची धार ही सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी असते. त्यांचे हृदय हे विशाल सागरा प्रमाणे आहे. त्यांच्या मनात द्वेष नाही. केवळ माणसाने,माणसाला माणूस म्हणून समजावीत. चुकीच्या दिशेने जाऊ नये. ते गेल्याने माणसाच्या वाट्याला दुःख येतात. माणसे दुःख मुक्त व्हावी या उद्देशाने त्यांचे सातत्याने लिखाण असते. त्यांच्या लिखाणातून अनेकांना खर समजून येते. त्यांना महापुरुषांच्या विचारांची जाणीव होते. ते प्रेरणा घेऊन न्यायासाठी लढण्यास तयार होतात. ती लाट म्हणजे क्रांतिकारी विचार होय. त्यांचा समुह होय. क्रांतीकारी विचारांच्या सागर लाटा या पुस्तकाचे लेखक सागर तायडे मुंबई हे एक निर्भीड लेखक म्हणून सन्मानास पात्र आहे. त्यांच्या ६३ व्या जन्म दिना निमित्याने मी दरवर्षी माझे मनोगत व्यक्त करत असतो. त्यांच्याशी मी नेहमीच बोलतो. पण त्यांच्या दैनिकातील वाचकाशी त्यांच्या जन्म दिनानिमित्या हार्दिक मंगल कामना देतांना आपल्या समोर व्यक्त होतो. त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा.

**अविनाश टिपले चंद्रपूर**
**७८७५९०९८०४**

# जागतिक प्राणी दिवस

जागतिक प्राणी दिन हा प्राणी हक्क आणि कल्याणासाठी कृतीचा एक आंतरराष्ट्रीय दिवस आहे. जागतिक प्राणी दिनाची सुरुवात सायनोलॉजिस्ट हेनरिक झिमरमन यांनी केली होती. त्यांनी २४ मार्च १९२५ रोजी जर्मनीतील बर्लिन येथील स्पोर्ट पॅलेस येथे पहिला जागतिक प्राणी दिन आयोजित केला होता. या पहिल्या कार्यक्रमाला ५००० हून अधिक लोक उपस्थित होते. पर्यावरण शास्त्राचे संरक्षक संत असिसीच्या संत फ्रान्सिस यांच्या मेजवानीच्या दिवसाशी संरेखित करण्यासाठी हा उपक्रम मूलतः ४ ऑक्टोबर रोजी नियोजित होता. मात्र त्या दिवशी स्थळ उपलब्ध नव्हते. त्यानंतर हा कार्यक्रम १९२९ मध्ये पहिल्यांदा ४ ऑक्टोबरला हलविण्यात आला. दरवर्षी झिमरमन यांनी जागतिक प्राणी दिनाच्या प्रचारासाठी अथक परिश्रम घेतले. शेवटी पर्यावरणासोबतच प्राण्यांचेही संरक्षण व्हावे, तसेच लोकांमध्ये प्राण्यांविषयी संवेदनशीलता आणि आपुलकीची भावना जागृत व्हावी. यासाठी मे १९३१ मध्ये इटलीतील फ्लोरेन्स येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय प्राणी संरक्षण काँग्रेसच्या पर्यावरण परिषदेमध्ये ४ ऑक्टोबर हा जागतिक प्राणी दिन म्हणून सार्वत्रिक करण्याचा त्यांचा प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला आणि ठराव म्हणून स्वीकारण्यात आला. तेव्हापासून दरवर्षी ४ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक प्राणी दिवस' म्हणून ओळखला जातो.

या दिवसाच्या समर्थनार्थ राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह भारतभर दरवर्षी दि. २ ते ८ ऑक्टोबर दरम्यान भारतातील वनस्पती आणि प्राणी यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने साजरा केला




जातो. या दरम्यान वन्यजीव सप्ताह- नॅशनल वाइल्डलाईफ वीक साजरा केला जातो. या वर्षी आपण ७० वा वन्यजीव सप्ताह साजरा करत आहोत. वन्यजीव सप्ताह करिता भारतीय वन्यजीव मंडळाची स्थापना करण्यात आली आणि भारताच्या वन्यजीवांचे संरक्षण करण्याच्या दीर्घकालीन उद्दिष्टांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी १९५२ मध्ये वन्यजीव सप्ताहाची संकल्पना मांडण्यात आली. सुरुवातीला वन्यजीव दिन १९५५ मध्ये साजरा करण्यात आला, तदनंतर १९५७ मध्ये वन्यजीव सप्ताह म्हणून श्रेणी सुधारित करण्यात आला. नामशेष होत चाललेल्या वन्य पशुपक्ष्यांबाबत जागृती निर्माण करणे हा त्यामागील हेतू आहे. आता या मूळ हेतूचा काळानुसार विस्तार झाला आहे. वन्यजीवांनी मानवी आयुष्यात प्रवेश करण्यामागची कारणे समजावून दिली जात आहेत. खरे तर कोणताही वन्यजीव स्वत:हून माणसांवर हल्ला करत नाही. परंतु त्यांच्या राहण्याच्या जागेवर शेती, रस्ते वा बांधकामाच्या रूपाने होणारे मानवी आक्रमण मर्यादे पलीकडे गेले की ते जंगलाच्या सीमेवरील खेड्यांत घुसून मुख्यत: पोटासाठी गाई गुरे मारतात व त्यातून मानव आणि वन्यजीव असा संघर्ष उद्भवतो. भारतासहित जगातील इतरही पुरातन संस्कृतींमध्ये सांगितल्याप्रमाणे मानव आणि वन्यजीवात मैत्री असणे ही संपूर्ण पृथ्वीची गरज आहे, कारण वन्यजीवांखेरीज मानव सुखाने राहूच शकणार नाही. ही जागृती रुजवण्यासाठी भारत सरकारने इंडियन बोर्ड ऑफ वाईल्डलाईफची स्थापना पूर्वीच केली आहे. जंगल सीमेवरील स्थानिकांना याबाबत योग्य माहिती, मार्गदर्शन व सुविधा पुरवावी तसेच वन्यजीवांबद्दल माहिती मिळवून त्यांचा जीवनक्रम समजून घ्यावा; ज्यामुळे त्यांच्याबद्दलचे गैरसमज दूर होऊ शकतील.

जागतिक प्राणी दिनाच्या चळवळीला नेका स्वेन्स्का, ब्रायन ब्लेस्ड आणि मेलानी सी सारख्या अनेक सेलिब्रिटींनी समर्थन दिले आहे. सर्व सृष्टीवर प्रेम करा' हे भारतीय संस्कृतीमध्ये अनेक प्रकारे सांगितले आहे. जगात अनेक ठिकाणी प्राणिमात्रांना क्रूरपणे वागवले जाते किंवा त्यांच्याकडे दुर्लक्षच केले जाते. वाढत्या लोकसंख्येमुळे पूर्वीची घनदाट जंगल तुटून तिथे गावाची नगरे व नगरांची महानगरे होत असताना भरपूर प्रमाणात जंगल तोड झाली. त्यामुळे प्राण्यांचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे. काही पाळीव प्राण्यांना अतिशय चांगले वागवले जाते, तर काहींना दिवसभरात खायला मिळत नाही. ही समस्या जगापुढे आणण्यासाठी जगभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. लहान-मोठ्या, पाळीव-भटक्या अशा सर्व प्राणिमात्रांचा यांमध्ये समावेश होतो. आज जागतिक प्राणी दिनानिमित्त सर्व प्राणी प्रेमींना हार्दिक शुभेच्छा!

# आमदार धिरज देशमुख यांनी घेतली श्री मनोज जरांगे पाटील यांची भेट

लातूर/ प्रतिनिधी : मराठा समाजाच्या आरक्षणासाठी व न्याय्य हक्कांसाठी लढा देत असलेले संघर्ष योद्धे श्री. मनोज जरांगे पाटील यांची छत्रपती संभाजीनगर येथील गॅलेक्सी हॉस्पिटल येथे 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी गुरुवारी सकाळी भेट घेतली व त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली.



गेल्या काही दिवसांपासून संघर्षयोद्धे श्री. मनोज जरांगे पाटील यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यामुळे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी त्यांची भेट घेवून तब्येतीची विचारपूस केली. तसेच त्यांच्यावर उपचार करणारे डॉ. विनोद चावरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांशीही आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी यावेळी संवाद साधला.

# विधानसभा निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी राबविले जाणार विविध उपक्रम !



लातूर(जिमाका) : भारत निवडणूक आयोगाकडून विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ कार्यक्रम घोषित होणार आहे. लातूर विधानसभा मतदार संघामध्ये निवडणूक विषयक विविध कामे सुरळीत व कालमर्यादेत पार पाडण्यासाठी तसेच मतदारसंघामध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी स्वीप कार्यक्रमातंर्गत शाळा, महाविद्यालयाच्या ठिकाणी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. लातूर शहर विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय दंडाधिकारी निवडणूक निणर्य अधिकारी रोहिणी नेऱ्हे–विरोळे यांनी या अनुषंगाने संबंधित शाळेचे मुख्याध्यापक, प्राचार्य, बीलएलओ, पर्यवेक्षक यांची ३० सप्टेंबर, २०२४ रोजी बैठक घेवून सूचना दिल्या.

मागील लोकसभा निवडणूकीमध्ये लातूर शहर मतदारसंघामध्ये मतदान जनजागृती संदर्भात मतदार जागृती रॅली, विविध स्पर्धा, विधाता गट स्थापन करणे, पालक मेळावा, स्वाक्षरी मोहित, सेल्फी पॉईंट तयार करणे, दिव्यांग मतदारांना संकल्प पत्र देणे, चुनावी पाठशाला इत्यादी नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले होते.

लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदारांनीदेखील आगामी विधानसभा निवडणूकीमध्ये जास्तीत जास्त मतदान करुन लोकशाही बळकट करण्याचे व लातूर शहर मतदरसंघाची मतदान टक्केवारी वाढविण्याचे आवाहन लातूर शहर विधानसभा मतदारसंघ निवडणूक निणर्य अधिकारी श्रीमती रोहिणी नेऱ्हे– विरोळे यांनी केले आहे.

तसेच मागील लोकसभा निवडणूकीमध्ये ज्या शाळा, महाविद्यालयाचे मुख्याध्यापक, प्राचार्य, बीएलओ, पर्यवेक्षक यांनी मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टिने चांगल्या प्रकारे उपक्रम राबविले अशा १० शाळा, महाविद्यालयांना मतदान जनजागृती (स्वीप) अंतर्गत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्रशस्तीपत्र देवून यावेळी सन्मानित करण्यात आले.

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सौदागर तांदळे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा नायब तहसीलदार गणेश सरोदे , नोडल अधिकारी स्वीप कक्ष निवृत्ती जाधव, जिल्हा परिषदेचे विस्तार अधिकारी (शि) मधुकर ढमाले, वरंवटी जिल्हा परिषद प्रशाला शाळेचे मुख्याध्यापक रामेश्र्वर गिल्डा यांच्यासह संबंधित शाळा, महाविद्यालयाचे मुख्याध्यापक, प्राचार्य, बीएलओ, पर्यवेक्षक, अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# कारच्या धडकेत दोघांचा बळी घेणाऱ्या तालुक्यातील चौघां आरोपींना अटक.

औसा : – परवा झालेल्या कारच्या धडकेत दोघांचा बळी घेणाऱ्या तालुक्यातील चौघां आरोपींना औसा पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे. या प्रकरणाच्या पार्श्र्वभूमीवर दुचाकी स्वराने कार चालकास हटकल्याचा राग मनात धरून कारने दुचाकीस उडविल्याने दोन जण ठार झाल्याप्रकरणी औसा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

औशातील पाहुण्यांना भेटून रविवारी रात्री पत्नीसह दोन मुलांना घेऊन दुचाकीवरुन लातूरकडे निघालेल्या दुचाकीला भरधाव कारने धडक देऊन उडवले होते. या बाबत माहिती की, औसा – लातूर राष्ट्रीय महामार्गावरील रोडवर रात्री ०८ : ४५ वाजण्याच्या सुमारास आपल्या ताब्यातील फोर्ड कार चालकाने बेदकारपणे गाडी चालवीत होते. तेव्हा दुचाकी चालकाने गाडी नीट चालवा म्हणून हटकल्याचा राग मनात ठेवून फोर्ड कारने मोटारसायकलला जोराची धडक दिली. यात मोटारसायकलवर असलेल्या चौघांपैकी दोघे जण ठार तर दोघांना जखमी केल्याप्रकरणी पाच जणाविरोधात औसा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा अपघात रविवारी रात्री घडला. यामध्ये पत्नी, मुलगी जागीच ठार झाली. तर दुचाकीचालक, मुलगा गंभीर जखमी झाला. याबाबत औसा पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल केला असून, चौघांना अटक केली आहे.

पोलिसांनी सांगितले, रविवारी रात्री ०८ : ४५ वाजता राष्ट्रीय महामार्गा जवळ हासाळा पाटी येथे कारने दुचाकीस जोरदार धडक दिल्याने यामध्ये एकाच कुटुंबातील दोघे जण जागीच ठार झाले तर दोघे गंभीर जखमी झाले असून या घटनेच्या दुसऱ्यादिवशी घटनेचे वास्तव समोर आले. पाच जण (एम.एच. ४४ जी. ०९७०) कारमधून औसा येथून लातूरकडे निघाले होते. यावेळी फिर्यादीही सादीक शेख हे दुचाकीवरुन (एम.एच. १३ सी.ई ७२३३) आपल्या परिवारासह लातुरातील घराकडे निघाले होते. यावेळी कार चालकाकडून रस्त्यावरील वाहनांना कट मारणे, शिवीगाळ करणे, आरडाओरडा करुन कार वेडीवाकडी चालविणे, असे प्रकार सुरु होते.

लातूर येथील सादीक उस्मान शेख हे आपल्या मोटारसायकल क्र. एमएच १३– सीई ७२३३ वरून आपल्या कुटुंबीयांसह औसा येथून लातूरकडे जात होते. फिर्यादीच्या दुचाकीलाही कारने कट मारली. यावेळी सादिक शेख यांनी विचारपूस केली असता कारमधील चार–पाच जणांसोबत बाचाबाची झाली. रात्री दोन चिमुकल्यासह पती–पत्नी दुचाकीवरुन प्रवास करत होते. दरम्यान एमएच ४४–जी–०३७० ही फोर्ड कार कारचालक वेडीवाकडी चालत होता. सादीक यांनी त्यांना गाडी नीट चालवा असे म्हटले दुचाकी पुढे गेल्यानंतर पाठीमागून येवून कारने जोरानें धडक देऊन उडवले. वेडीवाकडी का चालवता असे हटकवल्याचा राग मनात ठेऊन कारचालकाने जाणीवपूर्वक मोटारसायकलला पाठीमागून जोरात धडक दिली. त्यात इकरा सादीक शेख (वय २४), नादिया सादीक शेख (वय ३) हे ठार झाले, तर स्वतः सादीक उस्मान शेख व आहाद सादीक शेख (वय ६) हे जखमी झाले.याचा राग मनात धरून दारू पिलेल्या अवस्थेत कार चालकाने त्यांना पाठीमागून जीवे मारण्याच्या उद्देशाने जोरात धडक दिल्याने याबाबत औसा पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी फिर्यादी वरून कारमधील आरोपी दिगंबर पाटोळे, कृष्णा उर्फ विजय वाघे, बसवराज उर्फ प्रल्हाद धोत्रे, मनोज माने आणि मुदामे या आडनावाच्या व्यक्तीच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करून, या पाच जणांवर विविध कलमान्वये कारवाई केला आहे. पोलिसांनी कारमधील पाचही आरोपींना अटक केली असल्याची माहिती औश्याचे सपोनि कपील पाटील यांनी दिली.

# राष्ट्रीय व जागतिक सेरेब्रल पाल्सी दिनानिमीत्त आयोजित रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद



लातूर: लातूर जिल्हा परिषदेचा समाज कल्याण विभाग, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने क्रीडा संकुल येथे सेरेब्रल पाल्सी, बहुविकलांग, दिव्यांग मुलांसोबत चालण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाला नागरिकांचा, दिव्यांग मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या प्रसंगी समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे डॉ. योगेश निटुरकर, राजू गायकवाड, सहाय्यक सल्लागार बाळासाहेब वाकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी श्री. देवसटवार यांनी सर्व सेरेब्रल पाल्सी दिव्यांगांना सेरेब्रल पाल्सी दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री. नाईकवाडी यांनी सेरेब्रल पाल्सी दिव्यांग व्यक्तींना समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले.सेरेब्रल पाल्सी या विषयावर डॉ. निटुरकर यांनी माहिती दिली. यामध्ये सेरेब्रल पाल्सी म्हणजे मेंदूचा पक्षाघात होय. नवजात अर्भकाचा जन्म होताना मेंदूला ऑक्सिजन कमी पडणे हे त्याचे प्रमुख कारण आहे. याचे त्वरीत निदान होणे महत्वाचे आहे. निदान झाल्यानंतर नियमित फिजिओथेरपी, स्पीच थेरपी, ऑक्युपेशनल थेरपी बालकांची करुन घेणे हे अत्यंत महत्वपूर्ण आहे. शिशु किंवा बाल्याअवस्थेमध्ये अशा थेरपीचा खूप चांगला परिणाम व उपयोग होतो. दुर्दैवाने याचे महत्व पालकांच्या लक्षात न आल्यामुळे पाल्याच्या दीर्घकालीन जीवनातील अडथळ्याला सामोरे जावे लागते, असे त्यांनी सांगितले.

व्यसनमुक्ती तथा अमली पदार्थ सेवन विरोधी सप्ताहाच्यानिमीत्ताने समाज कल्याण विभागातील वैसाका श्री. गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा क्रीडा विभागाच्यावतीने दिव्यांगांसाठी स्वतंत्र क्रीडांगण उपलब्ध करून, पॅराऑलिंपीकची पूर्वतयारी करुन देण्याचा मानस क्रीडा अधिकारी श्री. इंगोले साहेब यांनी व्यक्त केला.मान्यवरांच्या हस्ते रॅलीला हिरवा झेंडा दाखवून उदघाटन करण्यात आले. रॅलीकरिता लातूर शहर व परिसरातील दिव्यांगांच्या विशेष शाळांमधील दिव्यांग विद्यार्थी, एमआयटी फिजीओथेरपी महाविद्यालयाचे विद्यार्थी, हासेगाव येथील फिजीओथेरपी महाविद्यालयाचे विद्यार्थी, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ लातूर उपकेंद्र येथील एमएसडब्ल्यूचे विद्यार्थी उपस्थित होते. रॅलीच्या आयोजनासाठी सर्व दिव्यांग शाळांमधील मुख्याध्यापक, विशेष शिक्षक, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे बस्वराज पैकै, शितल हिप्परगेकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यंकट लामजणे यांनी केले, प्रदर्शन सहाय्यक सल्लागार बाळासाहेब वाकडे यांनी आभार मानले.

# लातूरचा ऐतिहासिक सामुदायीक दसरा महोत्सव स्वागताध्यक्षपदी आ.रमेशआप्पा कराड यांची निवड

लातूर – दसरा धार्मीक सणा बरोबरच राष्ट्रीय सण असून क्षात्रतेजाचे दर्शन घडविणारा लातूर शहरात गेल्या एक्कावन वर्षापासून सामुदायीक दसरा साजरा करण्याची चांगली परंपरा चालत आलेली आहे. यावर्षीचा ५२ वा सामुदायीक दसरा महोत्सव साजरा करण्यासाठी विविध समित्या गठित करण्यात आल्या असून या महोत्सवाचे स्वागताध्यक्षपदी आ. रामेशअप्पा कराड यांची निवड करण्यात आली आहे तर कार्याध्यक्षपदी जयप्रकाश दगडे शहराध्यक्षपदी ईश्र्वर बाहेती व ग्रामीण आध्यक्षपदी प्रदीप पाटील खंडापुरकर यांची निवड करण्यात आलेली आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी सामुदायीक दसरा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याच्या अनुषंगाने आर्य समाजचे प्रधान शंकरराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत लातूरच्या सामुदायीक दसरा महोत्सव दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी भव्य दिव्य मोठ्या प्रमाणात साजरे करण्याचे सर्वानुमते निश्र्चित करण्यात आले. विविध पदाधिकाऱ्यांच्या एकमताने निवडी जाहीर करण्यात आल्या. त्यानुसार या महोत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी आ. रामेशअप्पा कराड यांची निवड करण्यात आली आहे तर शहराध्यक्षपदी ईश्र्वर बाहेती व ग्रामीण अध्यक्षपदी प्रदीप पाटील खंडापुरकर, कार्याध्यक्षपदी जयप्रकाश दगडे आदीसह अनेकांच्या निवडी करून त्यांच्यावर जबाबदारी देण्यात आली.

दसरा महोत्सवात लातूर शहर आणि ग्रामीण असे दोन विभाग नियोजना साठी करण्यात आले असून शहर विभाग शहराध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते ईश्र्वर बाहेती यांची तर ग्रामीण विभाग अध्यक्षपदी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदिप पाटील खंडापुरकर यांची निवड करण्यात आली. मुख्य संयोजकपदी वीर योद्धा संघटनेचे राज्य अध्यक्ष श्रीकांत रांजणकर कार्याध्यक्षपदी जयप्रकाश दगडे तसेच कोषध्यक्षपदी पतंजली योग समिती राज्याचे प्रभारी विष्णुजी भुतडा, शहर प्रमुख संयोजक संतोष तोष्णीवाल संयोजक ड. विजयकुमार



सलगरे, सरचिटणीस पदी व्यंकटेश हालिंगे यांची तर उपाध्यक्षपदी ड.गोपाळ बुरबुरे, रमाकांत बुरबुरे, प्रताप देशमुख सुरेश गोजमगुंडे, शेतकरी संघटनेचे दगडूसाहेब पडिले, भाजपाचे गुरुनाथ मग्गे, वनश्री मित्र मंडळाचे अध्यक्ष अजय गोजमगुंडे, आर्य समाज गांधी चौक अध्यक्ष ओमप्रकाश पाराशर, उपाध्यक्ष भारत माळवदकर, राजाराम ठाकूर, गोपाळ बुरबुरे, राम नगर आर्य समाजचे अध्यक्ष शंकरराव मोरे, हणमंत कोळेकर, शिवलिंग कुरे, अशोक पवार, दयानंद भालकीकर, वैजनाथ हालींगे, बाबू आप्पा सोलापुरे यांची निवड करण्यात आली. सहकोषाध्यक्ष पदी दिलीप कानगुले यांची निवड करण्यात आली. ग्रामीण प्रमुख संयोजक नीलकंठ साळुंके पाटील, महादेव खंडागळे, गोविंद जाधव, यांच्या निवडी जाहीर केल्या आहेत.

महिला दसरा महोत्सव अध्यक्षपदी ड. राणीताई स्वामी, कार्याध्यक्ष योगिताताई ठाकूर , उपाध्यक्ष सुवर्णाताई नाईक, काशीबाई हांडे, शीतलताई तम्मलवार सेक्रेटरी स्वेताताई परदेशी संघटक प्रितीताई कोळी सह कार्याध्यक्ष, मीनाक्षीताई दोरवे सहसंघटक, जानव्ही पेंडसे मुख्य संघटक तर सरचिटणीस पदी भातलोंडे, जयश्री भुतेकर सचिव रेखा खंदाडे सचिव तर रेश्मा होळकर सह सचिव, संयोजक मोक्षदा भंडारकोटे, सुरेखा गाडेकर संयोजक कल्पना बाबर संयोजक तसेच अमरजाताई गरड युवती अध्यक्ष ड. राधिका पाटील, दिव्या गिरी युवती कार्याध्यक्ष, दसरा महोत्सव युवक मंडळ अध्यक्षपदी आकाश गडगिळे, मुख्य संघटकपदी अमोल नान्नजकर, युवा अध्यक्ष अजय रेड्डी, कार्याध्यक्ष नितीन मोहनाळे, कायदेशीर सल्लागार मंडळाचे मुख्य संयोजक अँड विजयकुमार सलगरे, संयोजक अँड दिपक बनसुडे ड अभिषेक बुके, ड सतीश भालेराव, ड.योगेश बनसुडे, प्रसीद्धी समिती प्रमुख दयानंद जडे, विनोद चव्हाण, बालाजी गाडेकर, महेश गाडेकर, संघटक , संघटक संदीप पुणेकर, मिरवणूक समिती प्रमुख ओम गोपे, बाळासाहेब रेड्डी, महादेव कानगुले, अभिषेक पतंगे, राजाराम ठाकूर, मिरवणूक संयोजक राजेंद्र बनारसे, दत्ता सुरवसे, सुभाषप्पा सुलगुडले, बालाजी शेळके, महावीर काळे, रमाकांत बुरबुरे दासराव पाटील, हर्षवर्धन आकनगिरे, राजेंद्र दिवे, आनंत लोखंडे, रमेश्र्वर राउत, युवक मंडळ मिरवणूक समिती प्रमुख अजय रेड्डी, ऋषी चौहाण, रोहन जोशी, सुरक्षा समिती प्रमुख गणेश छत्रे आदिनाथ पवार, नवनाथ ढेकरे, विनोद रेड्डी, आदित्य होणे व ग्रामीण युवा अध्यक्ष तुषार रेड्डी, श्रावण रावणकुळे ग्रामीण उपाध्यक्ष, आदित्य कासले ग्रामीण संयोजक नेताजी जाधव ग्रामीण सरचिटणीस, राम पवार ग्रामीण सहसचिव दीपक भारती, श्री जुन्नी, शहर युवा संयोजक वैभव मिश्रा इत्यादींच्या निवडी जाहीर करण्यात आल्या.

या प्रसंगी बैठकीचे अध्यक्ष शंकरराव मोरे यांनी दसरा उत्सव अनुषंगाने मार्गदर्शन केले व निवड झालेल्या सर्व पदाधिकार्यांना शुभेच्छा दिल्या. बैठकीचे प्रास्ताविक व्यंकटेश हलिंगे यांनी केले तर सूत्रसंचालन दिलीप कानगुले यांनी केले व शेवटी उपस्थितांचे मुख्य संयोजक श्रीकांत रांजणकर आभार मानले.

# लातूर जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

लातूर (जिमाका) : येथील जवाहर नवोदय विद्यालयात २०२५ –२६ या शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता सहावीत प्रवेशासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यास ७ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

प्रवेश प्रक्रियाची सर्व माहिती https://navodaya.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्रवेश अर्ज निशुल्क ऑनलाइन भरण्यासाठी पालक व विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून प्रथम नवोदय विद्यालय समितीच्या वेबसाइटवरील प्रमाणपत्र डाउनलोड करून घेऊन इंटरनेटवर ऑनलाइन अर्ज भरावा ऑनलाइन अर्ज https://cbseitms.rcil.gov.in/nvs किंवा https://navodaya.gov.in या वेबसाइटवरुन भरावेत. या प्रमाणपत्रावर पाचवीत शिकत असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकांचा सही शिक्का, पालकांची सही, विद्यार्थ्याची सही व फोटो असणे आवश्यक आहे.

इयत्ता सहावीसाठी निवड चाचणी परीक्षेस बसणारा विद्यार्थी इयत्ता तिसरी, चौथी मध्ये सलगपणे उत्तीर्ण होऊन कोणताही खंड न पडता पाचवीमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये लातूर जिल्ह्यात शिकत असावा. त्याचा जन्म १ मे २०१३ ते ३१ जुलै २०१५ (दोन्ही दिवस पकडून) दरम्यानचा असावा. त्याचे पालक लातूर जिल्ह्याचेच रहिवासी असावेत अन्यथा ते प्रवेश अर्ज भरण्यास अपात्र असतील.

ऑनलाइन अर्ज भरण्याची अंतिम तारीख २३ सप्टेंबर, २०२४ होती परंतू नवोदय विद्यालय समितीने या मध्ये मुदतवाढ दिलेली असून अंतिम तारीख ७ ऑक्टोबर, २०२४ आहे. प्रवेश परीक्षा १८ जानेवारी २०२५ रोजी जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. इतर मागास (ओ. बी. सी.) प्रवर्गात अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी मार्च २०२५ पूर्वी भारत सरकारचे इतर मागास प्रवर्गाचे (ओ. बी. सी.– फॉर्म नंबर. ०९) जात प्रमाणपत्र काढणे आवश्यक आहे. एकदा अर्ज भरल्यानंतर त्यात बदल करता येत नसल्याने अर्ज भरताना परीक्षेचे माध्यम, वर्ग, शहरी/ ग्रामीण, मुलगा/मुलगी, जन्म तारीख याची खात्री केल्यानंतरच ऑनलाईन अर्ज जमा करावा. ज्या पालकांनी ७ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत अर्ज भरतांना लिंग (मुलगा/मुलगी), वर्ग (सामान्य / इतर मागास / अनु जाती/ अनु जमाती), क्षेत्र (ग्रामीण/शहरी), दिव्यांगता आणि परीक्षेचे माध्यम चुकीचे भरले असल्यास ते ८ ऑक्टोबर, २०२४ आणि ९ ऑक्टोबर, २०२४ रोजी वेबसाईटवर लॉगिन करून ऑनलाईन दुरुस्ती करू शकतात. ९ ऑक्टोबर, २०२४ नंतर कोणताही बदल करता येणार नाही.

आधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत लातूर जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा प्रभारी बी. डी. शेख ९८१७८३४९३० किंवा व्ही. एच. खिल्लारे ९८६०५६८८४० यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर जवाहर नवोदय विद्यालय प्राचार्य संजय पाटील यांनी केले आहे.

# युवा कॉँग्रेस अध्यक्षाला फासावर लटकवा भाजयुमोचे कॉँग्रेस भवन समोर आंदोलन

लातूर – शाळकरी बारा वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणारा शिक्षक म्हणून कार्यरत असणारा चंद्रपूर येथील युवक काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष अमोल लोंडे या नराधमास तात्काळ अटक करून फाशीची शिक्षा देण्यात यावी या मागणीसाठी भाजपचे प्रदेश सचिव ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वाखाली लातूर येथील काँग्रेस भवन कार्यालयासमोर लातूर ग्रामीण युवा मोर्चाच्या वतीने गुरुवारी सकाळी आंदोलन करण्यात आले.




शाळकरी मुलीवरच शिक्षकाने लैंगिक अत्याचार करून कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी युवक काँग्रेसचा शहराध्यक्ष अमोल लोंढे याने दिल्याचा प्रताप नुकताच उघडकीस आला असून माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या घटनेचा आणि आरोपीला पाठीशी घालणाऱ्या काँग्रेस पक्षाचा निषेध करण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा लातूर ग्रामीणच्या वतीने प्रदेश सचिव ऋषिकेशदादा कराड यांच्या नेतृत्वाखाली लातूर येथील काँग्रेस पक्षाच्या काँग्रेस भवन या कार्यालयासमोर युवा मोर्चाच्या वतीने निदर्शने करण्यात आली. यावेळी अत्याचार करणाऱ्या युवक काँग्रेस अध्यक्षला फाशी झालीच पाहिजे, पीडित मुलीला न्याय मिळालाच पाहिजे, अत्याचार करणाऱ्या नराधमाचे करायचे काय खाली मुंडकं वर पाय, धिक्कार असो धिक्कार असो काँग्रेसच्या नराधमाचा धिक्कार असो, आरोपीला पाठीशी घालणाऱ्या महाविकास आघाडीचा जाहीर निषेध, एकच चर्चा भाजपा युवा मोर्चा.. यासह विविध आक्रमकपणे घोषणाबाजी करून भारतीय जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस भवन समोरील परिसर दणाणून सोडला होता.

यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, युवक काँग्रेसचा अध्यक्ष शिक्षक असलेल्या या नराधमाने अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याच्या अनेक घटना समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही काँग्रेसच्या पुढार्याकडून हे प्रकरण दाबण्यासाठी पोलीस यंत्रणेवर दबाव आणून आरोपीला पाठीशी घालण्याचा नीच प्रकार केला जात आहे. बदलापूरची घटना घडली तेव्हा महाविकास आघाडीच्या नेत्यांनी तांडव निर्माण केला होता. आम्ही कोणत्याही घटनेचे समर्थन करत नाहीत. बदलापूर घटनेत मुलीला जो न्याय हवा होता तो मिळाला.

चंद्रपूरच्या या घटनेबाबत नाना पटोले, विजय वडेट्टीवार, संजय राऊत, सुषमा अंधारे व इतर कोणत्याही महाविकास आघाडीच्या नेत्यांनी साधी प्रतिक्रिया दिली नाही. राज्यात एखादी घटना घडली की राज्य सुरक्षित नाही महिला सुरक्षित नाहीत अशी बोंब ठोकणारे आणि दुटप्पी भूमिका सातत्याने घेणारे महाविकास आघाडीचे नेते आज का गप्प आहेत असा प्रश्र्न उपस्थित करून ऋषिकेशदादा कराड यांनी अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या युवक काँग्रेसचा अध्यक्ष अमोल लोंडे यास तात्काळ बेड्या ठोकून फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशी मागणी केली.

काँग्रेस भवन समोर झालेल्या या आंदोलनात भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, शहर जिल्हाध्यक्ष गणेश गोमसाळे, लातूर ग्रामीण विधानसभा प्रभारी सुरज शिंदे, अमर चव्हाण, संजय ठाकूर, दत्ता सरवदे, उत्तम चव्हाण, अशोक सावंत, शरद राऊतराव, विजय चव्हाण, दत्ता आंबेकर, हनुमंत गव्हाणे, चंद्रकांत माने, मारुती शिंदे, उज्वल कांबळे, शुभम खोसे, अच्युत कातळे, संतोष राठोड, सचिन लटपटे, आकाश बजाज, पंकज शिंदे, राजेंद्र गाडे, विनय जागते, गजेंद्र बोकन, संतोष तिवारी, बालाजी पिंपळे, शेख अजीम, सुरज फुलारी, हनुमंत भालेराव, प्रशांत शिंदे, बाळासाहेब कदम, रवी माकोडे, सौरभ देशमुख, समाधान कदम, विशाल कणसे, कार्तिक गंभीरे, ईश्र्वर बुलबुले, ओमकार भिसे, संतोष तगारे, ओम चप्पे, संजय सावंत, ओम चव्हाण, दिलीप पाटील, लक्ष्मण खलंग्रे, पांडुरंग बोडके, नितीन लोखंडे, अरुण जाधव, किशोर कवडे, ऋषिकेश इगे, आकाश जाधव, लखन आवळे, सोमनाथ वाघामारे यांच्यासह भारतीय जनता युवा मोर्चाचे असंख्य कार्यकर्ते सहभागी झाले होते.

